


सायं.दैनिक

# जननेता

• संपादक : नंदू गायकवाड •


प्रतिबिंब बदलत्या बीड जिल्ह्याचे..




• शुक्रवार, दि.१३ जुन २०२५ • TC - MAHMAR/2024/52979 • Email : jannetanews8@gmail.com • epaper.jannetanews.in • वर्ष १ • अंक १९५ • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# एसपी कॉवत साहेब, पोलिस व्हॅन व खासगी वाहनांमधून वाहतूक केलेले बॉक्स कशाचे?

## खुलासा करा : पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे वंचितचे अजय सरवदे यांची तक्रार





### पोलिस व्हॅनमध्ये नेमके काय होते? जे इतक्या रात्री एका खाजगी गाडीत द्यावे लागले? ती पोलिस व्हॅन कुठली होती? याची चौकशी बीड पोलिस अधिक्षक करतील का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहे!

बीड (प्रतिनिधी) दिनांक १२ जुन २०२५ रोजी मध्यरात्री १ वाजून १५ मिनिटांनी बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौका पासून फक्त २ किलोमीटर अंतरावर सोलापूर हायवेवर पेट्रोल पंपासमोर एका पोलिस व्हॅनमधून एका खाजगी गाडीत जिचा नंबर चक२३ध७९३ मध्ये पोलिस ४ ते ५ बॉक्स उतरवून पोलिस गाडी घेऊन गेले आणि ती खाजगी गाडी पण माल घेऊन त्यांच्या १० मिनिटाने निघून गेली. पोलिस व्हॅनमध्ये नेमके काय होते? जे इतक्या रात्री एका खाजगी गाडीत द्यावे लागले? ती पोलिस व्हॅन कुठली होती? याची चौकशी बीड पोलिस अधिक्षक करतील का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहे. या अगोदरही गोव्याची दारू पोलिसच्या व्हॅनमध्ये दारू बॉक्स, गुटखा बॅग बीडमध्ये पोहच केल्या जातात या गोष्टी एवढ्या गोपनीय केल्या जातात की पोलीस व्हॅन म्हटल्यानंतर कोणी जास्त लक्ष देत नाही. तसेच कोणी हटकल्यानंतर त्याला पॉलिसी खाक्या दाखवल्या जातात त्यामुळे या अगोदर कुणी तक्रार घेऊन पुढे आले नाही. पाथर्डी मार्गे औरंगाबादला जाणारे कपिल सरोदे यांनी घडलेला प्रकार त्यांच्या मोबाईलमधे कैद केला व सोशल मीडियावर टाकला आहे आता बीड पोलिस अधिक्षक नवनीत सर यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करत खुलासा करतील का? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## डॉ.संजय जानवळे यांनी बीडची मान उंचावली!

### दक्षिण आफ्रिकेत मॅराथॉन स्पर्धेत ९० किमी अंतर ११ तासात केले पार!




बीड (प्रतिनिधी):- बीड येथील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉक्टर संजय जानवळे हे विविध मॅराथॉन स्पर्धेत सहभागी होऊन उल्लेखनीय कामगिरी करत असून आतापर्यंत त्यांनी देशाबाहेर जाऊनही विविध स्पर्धेत सहभागी होऊन मोठे यश मिळवले आहे. त्यांच्या या यशाचा आदर्श प्रत्येकाने घेण्यासारखा आहे.डॉक्टर संजय जानवळे यांनी दक्षिण आफ्रिका येथे संपन्न झालेल्या कॉम्रेड मॅराथॉन स्पर्धेत सहभागी होऊन मिळवलेल्या यशाने बीडची मान उंचावली आहे. डॉक्टर संजय जानवळे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. रविवार, दिनांक ८ जून २०२५ रोजी दक्षिण आफ्रिका येथे संपन्न झालेल्या जगातील एक अवघड व प्रतिष्ठेची समजली जाणाऱ्या 'कॉम्रेड मॅराथॉन', स्पर्धेत सहभागी होत बीड चे डॉ. संजय जानवळे ९० किमी अंतर ११ तास ३७ मिनिटात पार केले. जगभरातल्या सुमारे ७० देशातील तेवीस हजार धावपटूंनी या स्पर्धे त सहभाग नोंदवला होता. पीटरम रीत्जिबर्ग ते डर्बन असा चढउताराचा हा मार्ग पार करताना धावपटूंचा कस लागतो, या स्पर्धेत भारतातून सुमारे ४१२ तर बीडहून डॉ. जानवळेसह अन्य ३ धावपटू सहभागी झाले होते. त्यात अस्थीव्यंग तज्ञ डॉ. विश्वास गवते ( १० तास ४६ मिनिटे) पोलिस अधिकारी साईनाथ ठोंबरे (सध्या पुणे) ( ११ तास २० मिनिटे) हरी ठोंबरे ( ११ तास १४ मिनिटे) या तिघांनीही या स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी केली.डॉ. संजय जानवळे, 'पन्नाशी ओलांडल्यानंतर ९० किमी अंतर पार करणे, माझ्यासाठी आव्हान होते.गेली ५ महिने या स्पर्धेसाठी कसून सराव केला. दक्षिण आफ्रिकेत देशाचं प्रतिनिधित्व करताना अभिमान वाटत होता. स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर खूप आनंद झाला.सर्व बीडकरांचे प्रोत्साहन मोलाचे ठरले. योगा प्रतिष्ठान व सर्वच धावपटूंनी मार्गदर्शन केले. मॅरेथॉन स्पर्धेमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल डॉ. संजय जानवळे यांचे सर्व स्तरातून स्वागत होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## शाहुनगरमध्ये गावठी कट्टा बाळगणारा एलसीबीने पकडला




बीड (प्रतिनिधी): पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना माहिती मिळाली की, एक इसम नामे जुबेर सय्यद हा त्याचे कमरेला गावठी कट्टा लावून शाहूनगर येथील हनुमान मंदिराचे बाजूला उभा आहे. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक बंटेवाड यांनी एक पथक सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता एक इसम तेथे मिळून आला. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने जुबेर जावेद सय्यद, वय १८ वर्ष रा. हनुमान चौक, शाहूनगर, बीड असे सांगितले. पोलीस पथकाने त्याची अंगझाडती घेतली असता त्याचे कमरेला गावठी कट्टा मिळून आला. सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरन ३३०/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.

## आवाजाच्या टू व्हीलर वाहनधारकावर वाहतूक शाखेची कारवाई!

बीड (प्रतिनिधी): दि.११ जून २०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेची बीड शहरांमध्ये मोठा आवाज करणारे बुलेट सायलेन्सर व मोटर सायकल ला फॅन्सी नंबर प्लेट विरुद्ध विशेष मोहिम राबवून १९ मोठे कर्णकर्कश: आवाज करणारे सायलेन्सर व २५ फॅन्सी नंबर प्लेट यांच्यावर कारवाई करून जप्त करण्यात आले. सदर कारवाई बीड शहर वाहतूक पोलिसांकडून बीड पोलीस अधीक्षक नवनीत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखा प्रभारी अधिकारी सपोनी सुभाष, पीएसआय विजय , पोलीस कर्मचारी शिवदास, पो.कॉ.वसीम, पो. कॉ. अनिकेत, पो.कॉ.ड्रायव्हर संतोष यांनी केली आहे. सदरच्या कार्यवाहीमुळे फॅन्सी नंबरप्लेट ठेवणार्या वाहनधारकांचे तसेच ठोऽऽ ठोऽऽ आवाज करणार्या वाहनधारकांचे धाबे दणाणले असून नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## बातमीची घेतली दखल : ज्योतीताई मेटे आयटीआयला भेट देऊन पाहणी करणार

बीड (प्रतिनिधी): शहरात असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थातच आयटीआय ची झालेली दुरावस्था, ३१४० जागा असूनही फक्त २५०० विद्यार्थ्यांचे आलेले अर्ज, अनेक ट्रेड्सला विद्यार्थी मिळत नसल्याने इन्स्ट्रक्टरांना विद्यार्थी मिळविण्यासाठी घरोघरी-दारोदारी भटकण्याची आलेली वेळ, विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान पाहता याविषयी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी ज्योतीताई विनायकराव मेटे यांना उद्देशून 'ज्योतीताई, मेटे साहेबांच्या नावाखातर तरी आयटीआय कडे लक्ष द्या; विद्यार्थी आणि पालक फिरवताहेत पाठ' या शीर्षकाने प्रसिद्धी माध्यमातून बातमी दिली होती. बीड शहरातील आयटीआयला दिवंगत नेते विनायकरावजी मेटे यांचे नाव देण्यात आले आहे. त्यांचे नाव असलेल्या या आयटीआयची अशी अवस्था बातमीतून विशद केल्यानंतर याची दखल घेत ज्योतीताई लवकरच बीडला येऊन आयटीआयची पाहणी करणार असल्याचे त्यांनी भ्रमणध्वनीवरून बोलताना सांगितल्याची माहिती एस.एम.युसूफ़ यांनी दिली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, प्रसिद्धी माध्यमातून बातमी येताच दस्तूरखुद्द ज्योतीताईंनी याची नोंद घेतली आणि भ्रमणध्वनी वरून बोलताना आयटीआय बद्दल सखोल माहिती घेतली. यावेळी आयटीआयची झालेली दुरावस्था, प्रत्येक




ट्रेड्सच्या विभागाला आलेली अवकळा, कोणत्याच विभागात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी नीटनेटके बाकडे, टेबल किंवा डेस्क व्यवस्थित नाहीत. पिण्याच्या पाण्याचे सर्व फिल्टर प्लांट बंद आहेत. साधे पाणी सुद्धा पिण्यास उपलब्ध नाही. आयटीआय अंतर्गत असलेले सर्व रस्ते डोंगरदर्यासारखे झालेले आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्याने संपूर्ण रस्ते चिखलाने माखलेले आहेत. अशा अवस्थेत येथे शिक्षण घेण्यास येणाऱ्या जिल्हाभरातील विद्यार्थ्यांना मोठ्या हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. यावर कहर म्हणजे एकही ट्रेड्सचे इन्स्ट्रक्टर आठवड्यातील सहा दिवस उपस्थित राहत नाहीत. अनेक इन्स्ट्रक्टर आळीपाळीने दांडी यात्रेवर असतात. प्राचार्यांची सुद्धा अशीच अवस्था आहे. प्राचार्य स्वतःच दांडी यात्रेवर असल्याने त्यांचा इन्स्ट्रक्टरांवर अंकुश नाही. इन्स्ट्रक्टर नियमित येत नाहीत म्हणून अनेक विद्यार्थी ही अनुपस्थित असतात. अशा एक ना अनेक बाबी भ्रमणध्वनी वरून बोलताना एस.एम.युसूफ़ यांनी ज्योतीताई मेटे यांच्या कानी घातल्या. या सर्व बाबी ऐकून त्यांनी बीडला आल्याबरोबर आयटीआय ला भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितल्याची माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली असून याविषयी ठळक बातमी प्रसिद्ध करणाऱ्या सर्व वृत्तपत्रांचे आभार व्यक्त केले आहे.

## अहमदाबाद विमान अपघात ही जगाला सुन्न करणारी घटना : सचिन उबाळे

### ठेवीदार कृती समितीच्या वतीने मृतांना भावपूर्ण श्रध्दांजली



बीड (प्रतिनिधी) अहमदाबादमध्ये आज सकाळी टेक ऑफ करणाऱ्या विमानाचा मोठा अपघात झाला असून विमानातील सर्व प्रवासी मृत झाल्याची माहिती येत आहे. ही घटना देशालाच नव्हे तर जगाला सुन्न करणारी आहे अशा शब्दांत स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे यांनी मृतांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. अहमदाबादरमधील सरदार वल्लभभाई पटेल विमानतळजवळ एअर इंडियाच्या प्रवासी विमानाचा उड्डाणादरम्यान भीषण अपघात झाला. उड्डण केल्यानंतर अवघ्या काही मिनिटात दोनशेहून अधिक प्रवासी घेऊन जाणारे हे विमान मेघनानगर परिसरात कोसळल्याची दुर्घटना घडली. अहमदाबादमध्ये झालेला विमान अपघात ही मोठी दुर्घटना आहे. या दुर्घटनेने जगाला धक्का दिला आणि दुःखी केले आहे.आपत्तीच्या काळात सर्वांनी एकत्र येऊन मदतीचा हात देणं आवश्यक आहे. या दुःखद घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांच्या आत्म्याला शांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखावर मात करण्याची शक्ती लाभो अशी भावना प्रा.सचिन उबाळे यांनी व्यक्त केली.

नवगण शिक्षण संस्थेचे

## कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा ता.जि.बीड

## Walk in Interview

### (प्रत्यक्ष मुलाखत)

शैक्षणिक वर्षे २०२५-२०२६ साठी कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा येथे पदवी व पदव्युत्तर विभागात अनुदानित व विनाअनुदानित विषयास खालीलप्रमाणे तासिक तत्वावर/निश्चित वेतनावर सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरावयाची आहेत. नियमाप्रमाणे अर्हताप्राप्त उमेदवारांनी अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांच्या मुळ व छायांकित २ प्रतिसह दि.२२/६/२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. सौ.के.एस.के.महाविद्यालय, बीड जि.बीड येथे प्रत्यक्ष मुलाखतीस वेळेवर स्व:खर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| पदवी कला अनुदानित (CHB) | | |
|---|---|---|
| अ. क्र | विषय | पद संख्या |
| 1 | मराठी | 03 |
| 2 | हिंदी | 03 |
| 3 | समाजशास्त्र | 02 |
| 4 | भूगोल | 02 |
| 5 | अर्थशास्त्र | 02 |
| 6 | राज्यशास्त्र | 02 |
| 7 | इतिहास | 02 |
| कायम विनाअनुदानित | | |
| 1 | इंग्रजी (Opt) | 02 |
| 2 | गृहशास्त्र | 02 |
| 3 | शा. शिक्षण | 02 |
| 4 | लोकप्रशासन | 02 |

| पदवी कला अनुदानित (CHB) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | विषय | पद संख्या |
| 1 | मराठी | 02 |
| 2 | हिंदी | 02 |
| 3 | समाजशास्त्र | 02 |
| 4 | भूगोल | 02 |
| 5 | राज्यशास्त्र | 02 |
| 6 | इतिहास | 02 |
| पदवी विज्ञान कायम विनाअनुदानित | | |
| 1 | रसायन शास्त्र | 03 |
| 2 | भौतिक शास्त्र | 02 |
| 3 | वनस्पती शास्त्र | 02 |
| 4 | प्राणिशास्त्र | 02 |
| 5 | संगणक शास्त्र | 02 |

**नियम व अटी :**

१) सहसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे मान्यता पत्र क्र.जा.क्र.सहसं/उशी/छ.संवि/आशा.आस्था-१/२०२५/२३४० दि.१९/०५/२०२५

२) शैक्षणिक आरक्षण व अर्हता शासन यु.जी.सी.आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नियमानुसार राहील.

३) मुलाखतीसाठी नाव नोंदणी मुलाखतीच्या दिवशी ९ ते १० या वेळेत प्रत्यक्ष करणे आवश्यक राहील.

**प्राचार्य**
**कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता.जि.बीड**

**सचिव**
**नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता.जि.बीड**

## पाडळी परिसरात पावसामुळे प्रचंड नुकसान!

### पाहणी करायला आलेले तहसीलदार शेतकऱ्यांशी उर्मट वागले







पाडळी (प्रतिनिधी): शिरूर कासार तालुक्यातील पाडळी येथे दिनांक १२ गुरुवार रोजीवादळी वाऱ्यासह अचानक आलेल्या पावसामुळे शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे त्याचप्रमाणे घरावरील छत उडून गेले आहेत तर मोठमोठाले झाडे ही उलथून पडली आहेत. अचानक झालेल्या वादळीवारासह पावसामुळे मोठ मोठाली झाडे उलथून पडली आहेत तसेचअनेक आंब्याच्या बागाचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे .अनेक शेतकऱ्यांच्या घरावरील छत उडून गेले आहेत पत्र्याचे शेड कोसळले आहेत याबाबतची माहिती सरपंच गहिनाथ जिजा पाखरे यांनी संबंधित विभागाशी फोनवरून कळविल्यानंतर संबंधित विभागाचे अधिकारी येऊन पंचनामे झालेली आहेत .शिरूर चे तहसीलदार घोळवे यांनी पाडळी येथे भेट देत नावाला फक्त एका जागेवरचे पाहणी करत परत गावातून काढता पाय घेतला . गावकऱ्यांनी तलाठी वेळेवर येत नाहीत कामे करत नाहीतअसे सांगितल्यानंतर तहसीलदार साहेबांनी गावकऱ्यांनाच उदंड भाषा करत तुम्ही तलाठ्याची लेखी तक्रार करा असे बे जबाबदार वक्तव्य करत .शेतकऱ्यांना तुम्ही मला शिकवू नका अशी उरमट भाषा वापरली .नुकसानीची पाहणी करायला आलेले तहसीलदार नोकरदार आहेत हेच विसरून गेले व मालक असल्या च्या अविर्भावात गावकऱ्यांची वागले .तहसीलदार गावातून गेल्यानंतर शेतकरी व युवकांमध्ये ही कसली हुकूमशाही अशी चर्चा रंगली होती . वाह रे तहसीलदार.....!पाडळी येथे पावसामुळे नुकसान ग्रस्त भागाची पाहणी करायला आलेले तहसीलदार घोळवे यांना गावकऱ्यांनी तलाठी वेळेवर येत नाहीत .कामे होत नाहीत अशा तक्रारी सांगितल्यानंतर तुम्ही तलाठ्यांची लेखी तक्रार करा असा उलट दम तहसीलदार यांनी गावकऱ्यांना दिला. तसेच गायरान जमिनीवरील मुरूम कोणता तरी गुत्तेदार खोदून नेत आहे असे गावकऱ्यांनी सांगितल्यानंतरही तहसीलदार साहेबांनी या गोष्टीकडे कानाडोळा करत कुठलीही चौकशी केली नाही त्यामुळे वारे तहसीलदार असे म्हणत गावकऱ्यांनी रोष व्यक्त केला.

## संपादकीय..

# विमान दुर्घटना भयावह..



दि.१२ जून २०२५ ही तारीख, सर्व देशवासीयांसाठी एक भयावह मृत्यूचा थरार ऐकविणारी ठरली. कोणाच्या मनीध्यानी नसताना गुरुवारी दुपारी गुजरातमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर देशाचे वातावरण हादरून गेले. परदेशी प्रवाशांना घेऊन लंडनसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात काही मिनिटांत कोसळल्याची दुर्घटना घडते. या अपघाताची माहिती ज्यांच्या ज्यांच्या कानावर पडते त्यांची एक सार्वत्रिक प्रतिक्रिया असते, बापरे. बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरते अन् सारा देश सुन्न झाल्याचे चित्र पाहायला मिळते. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह एकूण २४२ प्रवासी होते.

ज्या डॉक्टरांच्या हॉस्टेलच्या इमारतीवर विमान आदळले, तिथे किती नुकसान झाले. डॉक्टरांसह किती जणांचे बळी गेले हा आकडा कानावर येण्याअगोदर विमानातील २०० हून अधिक मृत्युमुखी पडल्याची बातमी हृदय हेलावणारी होती. सुदैवाने दोन प्रवासी नशीब बलवत्तर म्हणून वाचला. आता विमान जळून खाक झालं. त्यामुळे प्रवाशांची ओळख पटणे हे जिकिरीचे काम असल्याने, जे प्रवासी मृत्युमुखी पडले त्यांचे अंत्यसंस्कार कसे होणार हा नातेवाइकांच्या दृष्टीने भावनिक मुद्दा आहे. विमान प्रवाशांबरोबर काळाने डॉक्टरांच्या समूहावरही घाला घातला. दुपारचे जेवण करताना तोंडात घास पडण्याऐवजी २० हून अधिक डॉक्टरांना मृत्यूने कवटाळल्याचा प्रकार हा स्थानिक गुजरातच्या जनतेवर दु:खाचा डोंगर कोसळल्यासारखाच होता. हा अपघात कसा झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर काही मिनिटांत दुर्घटना घडली. लगेच ६२५ फुटांवरील विमान अहमदाबाद हॉर्स कॅम्पजवळ कोसळले. बोईंग विमानाने आधी पेट घेतला आणि नंतर ते कोसळले. विमानाचा मागचा भाग झाडाला धडकल्याने अपघात झाला की, विमानाच्या इंजिनात बिघाड झाल्याने हा अपघात झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतात आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताच्या दुर्घटनांमध्ये अहमदाबादचा अपघात ही अलीकडची मोठी दुर्घटना मानली जात आहे. मात्र या विमान अपघाताच्या बातमीनंतर मुंबईकरांना घाटकोपरसारख्या गजबजलेल्या परिसरामध्ये २०१८ साली कोसळलेल्या विमान अपघाताची आठवण झाली. घाटकोपरमध्ये कोसळलेले विमान हे लहान आकाराचे म्हणजेच चार्टर विमान होते. चाचणी उड्डाणादरम्यान म्हणजेच टेस्ट फ्लाईटदरम्यान किंग एअरचे चार्टर विमान अपघातग्रस्त होऊन वस्तीत शिरले होते. तसे पाहिले तर भारतात पहिला विमान अपघात १९३८ मध्ये झाला होता. एअर फ्रान्सचे पोटेझ विमान मध्य प्रदेशातील दातियाजवळ कोसळले. त्यात सात जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या पंधरा वर्षांतील भारतातील दुसरा मोठा अपघात कर्नाटकातील मंगळूरु येथे मे २०१० मध्ये घडला, या अपघातात १५८ जण मृत्युमुखी पडले होते. फेब्रुवारी १९९० मध्ये बंगळूरुमध्ये एअरबस ए ३२० विमान लँडिंग करताना धावपट्टीवरून घसरले आणि शेतात पडले, त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला होता. पायलटच्या चुकीमुळे आतापर्यंत अनेक दुर्घटना घडल्या आहेत. मात्र, याआधी विमानावर दहशतवादी हल्लाही झाला होता. तो जून १९८५ साली खलिस्तान समर्थकांनी विमानावर दहशतवादी हल्ला केला होता.

एअर इंडिया फ्लाइट १८२ त्यावेळी आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ अटलांटिक महासागरात बॉम्बस्फोटात उडवून देण्यात आले होते. त्यात ३२९ लोकांचा मृत्यू झाला होता. आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताची कारणे पाहिली तर वैमानिकाची चूक हे विमान अपघातांचे एक प्रमुख मानले जाते. वैमानिकांकडून जेव्हा टेकऑफ दरम्यान वेग, धावपट्टीच्या लिफ्ट ऑफ पॉइंट किंवा पिच अँगलचा चुकीचा अंदाज घेतला जातो, तेव्हा अपघात होतात. आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक अहवालांनुसार, टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान होणाऱ्या बहुतेक अपघातांमध्ये मानवी चूकही कारणभूत ठरली आहे. त्याचे कारण, टेकऑफ अपघातांपैकी ६५% मानवी चुकांमुळे होतात आणि २०% तांत्रिक बिघाडामुळे तर, १०% हवामानामुळे होतात, ५% इतर कारणांमुळे होतात, अशी जगभरातील आकडेवारी सांगते. संपूर्ण टेकऑफ प्रक्रिया पायलटच्या नियंत्रणाखाली असते. प्रत्येक निर्णय काही सेकंदांत घ्यावा लागतो. टेकऑफ दरम्यान ऑटो-पायलट नसतो, सर्व नियंत्रण मॅन्युअल असते. टेकऑफचे नियोजन आणि आपत्कालीन स्क्रिप्ट देखील पायलटच्या योजनेवर अवलंबून असते. म्हणूनच टेकऑफ दरम्यान अपघात झाल्यास, विमान वाहतूक तज्ज्ञ प्रथम पायलटच्या निर्णयाची आणि प्रतिक्रियेची तपासणी करत असतात. तसेच खराब हवामानामुळे टेकऑफ दरम्यान विमान अपघात होण्याची कारणे पुढे आलेली आहेत. टेकऑफ दरम्यान जोरदार वारे, गडगडाट, कमी दृश्यमानता किंवा मायक्रोबर्स्ट ही अपघातांची प्रमुख कारणे असतात. इंजिनमध्ये समस्या असल्यास, पक्षी आदळल्यास किंवा सिस्टममध्ये बिघाड झाल्यास, पायलटला काही सेकंदांत निर्णय घ्यावा लागतो की टेकऑफ सुरू ठेवायचे की धावपट्टीवर विमानाला काही प्रकारे थांबवण्याचा प्रयत्न करायचा. अहमदाबाद विमान दुर्घटनेतील पायलट सुमित सबरवाल हा सुद्धा आज जगात नाही. नक्की काय घडले हे आता सांगता येणार नसले तरी, ज्या पद्धतीने गेल्या काही वर्षांत विमान प्रवाशांची संख्या वाढलेली आहे. ते पाहता, भविष्यात अपघात होऊ नये यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर व्हायला हवा. जीवाची किंमत मोठी आहे. एका क्षणार्धात होत्याचे नव्हते... असे एका विमान अपघातातून घडू शकते. अपघात टाळण्यासाठी विमान कंपन्यांबरोबर केंद्र सरकारनेही अधिक लक्ष घालायला हवे.

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा : प.पूज्य प्रदीप मिश्राजी



चाकरवाडी (प्रतिनिधी): देव हा देवच आहे, तो लहान किंवा मोठा नसतो, देवाची भक्ती ही भक्तीच असते ती कोणत्याही देवाची असली तरी चालते. नामस्मरणात मानवी जीवनाला सुख मिळत असते. त्यामुळे देवात भेद न करता देवा समान आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्ला परमपूज्य प्रदीप मिश्राजी यांनी दिला.

चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महा न संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित शिवपुराण कथेत प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, आपल्या आयुष्याच कल्याण करायचं असेल तर कोणीही देवा देवात भेद भाव करू नये. शिव श्रेष्ठ की विष्णु श्रेष्ठ हा भेद करू नये, माझा देव श्रेष्ठ दुसरा कनिष्ठ असा भेद करू नये. माझा मंत्र श्रेष्ठ त्याचा कनिष्ठ असा भेद करणे चुकीच आहे. तुम्हाला देव पाहायचा असेल तर खरा देव तुमच्या घरात आहे आई वडिलच तुमचा देव आहे आई वडिलांची सेवा हि जगातील सर्वात श्रेष्ठ देवाची सेवा आहे. आई वडील यांची सेवा करा शिव महादेव काहीही कमी पडू देणार नाही. देव आणि भक्ती हा संबंध जवळचा असून भक्ती केली तर देव मिळतो देव आहे त्यामुळे भक्ती केली पाहिजे श्रेष्ठ कनिष्ठ असा देवा त भेद करू नये भक्ती मध्ये मोठी शक्ती असून मानवी जीवनाच्या सुखासाठी नामस्मरण करणे गरजेचे आहे. देवाच्या भक्ती बरोबरच आई-वडिलांची सेवा केल्यास मानवी आयुष्यात सर्वांना सर्व काही मिळेल एवढी ताकद देवामध्ये आहे त्यामुळे देवाची भक्ती आणि आई-वडिलांची सेवा केलीच पाहिजे असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी केले. यावेळी राज्यभरातून आलेले लाखो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान मंगळवारी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले.

# शेतरस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी पिराजी शिंदेसह कुटुंबाचे आमरण उपोषण सुरू

## जिल्हा प्रशासन मात्र सस्ती अदालत नावाखाली आपली पाठ थोपटून घेऊन पत्रकबाजी करण्यात व्यस्त : डॉ.गणेश ढवळे




वैद्यकिन्ही (प्रतिनिधी): पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील शेतकरी पिराजी उत्तमराव शिंदे हे वैद्यकिन्ही,वैजाळा या दोन्ही गावांच्या मधला गट नंबर २५४ मधील पश्चिमेकडे जाणारा शिवरस्ता काही शेतकऱ्यांनी जाणिवपूर्वक बंद केल्याने शेतात जाण्यायेण्यासाठी अडचण येत असुन तातडीने खुला करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी बीड आणि तहसीलदार पाटोदा यांना दि.०५ जुन रोजी लेखी निवेदनाद्वारे सहकुटुंब आमरण उपोषणाचा इशारा देऊनही त्याची दखल प्रशासनाने न घेतल्याने आज दि.११ वार बुधवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून वैद्यकिन्ही ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले असुन आमरण उपोषणात पिराजी उत्तमराव शिंदे, पत्नी वैशाली पिराजी शिंदे, आई गंगुबाई उत्तम शिंदे, मुलगा शिवराम पिराजी शिंदे आणि ३ मुली दिक्षा,प्रतिक्षा, दुर्वा पिराजी शिंदे सहकुटुंब उपोषणाला बसले आहेत. मात्र एरवी पेपरबाजी करणा-या जिल्हा आणि तहसील प्रशासनाला यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही.नायब तहसीलदार मुळे यांनी फोनवरून २-३ दिवसात प्रश्न सोडवु तुम्ही उपोषण मागे घ्या असा सल्ला दिला तर पिराजी शिंदे हे शिवरस्ता खुला करून दिल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाहीत यावर ठाम आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देणार यासाठी विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सस्ती अदालत उपक्रम राबविण्यात येत असल्याचे तसेच दर सोमवारी तहसील कार्यालयात जनता दरबार घेऊन प्रश्न निकाली काढण्यात येणार असल्याची दैनिकातुन प्रसिद्धीही दिली मात्र वास्तवात शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देण्यात यावेत या मागणीसाठी सहकुटुंब आमरण उपोषणाला बसावे लागते आहे.त्यामुळे जिल्हा व तहसिल प्रशासनाने स्टंटबाजी न करता शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' शासकीय निवासस्थानी खा.छत्रपती उदयनराजे भोसले यांची सदिच्छा भेट



मुंबई (प्रतिनिधी): राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी छत्रपती शिवाजीमहाराज यांचे वंशज खा.श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी प्रथमच सदिच्छा भेट दिली. या औपचारिक भेटीचे स्वरूप अत्यंत मनमोकळे आणि आत्मीयतेचे ठरले. यावेळी ना पंकजाताई मुंडे यांनी महाराजांचे हृदयपूर्वक स्वागत केले. भेटीदरम्यान, दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि उदयनराजे भोसले यांच्यातील जुने राजकीय व कौटुंबिक संबंध, आठवणींमधून उजळत गेले. या चर्चेतून दोन्ही कुटुंबांमधील स्नेहबंध पुन्हा दृढ झाल्याचे जाणवले.या प्रसंगी आ. सीमाताई हिरे तसेच इतर शिष्टमंडळही उपस्थित होते. या भेटीमुळे केवळ औपचारिकतेपेक्षा एक विशिष्ट आत्मीयता आणि भावनिक संवादाचा क्षण उपस्थित झाला.



# राष्ट्रवादी ज़िल्हा कार्यालयात खुर्शीद आलम यांच्या हस्ते ध्वजारोहण

बीड (प्रतिनिधी): राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचे २६ वर्धापनदिन निमित्ताने बीड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यालयात राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विधानसभा अध्यक्ष मदन जाधव सर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, तर तालुका अध्यक्ष बाबासाहेब गोरे यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी ग्रंथालय सेलचे डॉ.राजेंद्र सानप, राष्ट्रवादी युवक चे शहराध्यक्ष सचिन दुधाळ, जेष्ठ नेते अनिल कर्डुले, शेख सबुर, सुशील जाधव, फैय्याज मन्यार, नितीन खांडे,शेख कलीम,शेषराव तांबे,अभय बीडकर, कुणाल चौहान, सोफ्यान कुरेशी,अमित चव्हाण, महेबुब इनामदार, आदी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचे २६ वर्धापनदिन निमित्ताने बीड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यालयात राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विधानसभा अध्यक्ष मदन जाधव सर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, तर तालुका अध्यक्ष बाबासाहेब गोरे यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले.

# स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान बीडच्या वतीने दिनांक १६ जून ते १८ जून भव्य कीर्तन महोत्सव

बीड (प्रतिनिधी): शहरामध्ये गेल्या पंचवीस वर्षाची स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानची कीर्तन परंपरा अविरत चालू आहे येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त १६ जून ते १८ जून या कालावधीमध्ये सकाळी दहा ते सायंकाळी १० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे महाराष्ट्रातील सात ख्यातनाम सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार आहे आषाढी एकादशी ची लगबग संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्राच्या बाहेर चालू आहे याचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर संत नामदेव महाराज संत तुकाराम महाराज संत एकनाथ महाराज अनेक सांप्रदायिक संतांचे विचार मनुष्य भवासाठी संताचे विचार किती लाख मोलाचे होते अनेक दशकानंतर सुद्धा ते सिद्ध होते हे विचार कायम मनुष्यामध्ये राहावे याकरिता कायम संत विचार मांडण्याचा प्रयत्न प्रतिष्ठान गेले कित्येक वर्षापासून करत आहे या सात कीर्तनामधून या तीन दिवसांमध्ये आपण आषाढी वारीचे संपूर्ण चित्रण उभा करणार आहोत जसे की आपण आळंदी ते पंढरपूर या वारीमध्ये सामील आहोत अस आपल्याला वाटेल असा हा कार्यक्रम आहे बीड शहरातील सर्व भाविक भक्तांना विनंती आहे की अतिशय दर्जेदार हा सात कीर्तनाच्या महोत्सव करता आपण बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील सर्व भाविक भक्त आमंत्रित आहात कारण आपल्या बीड शहराला सांप्रदायिक कीर्तनाची खूप मोठी गेल्या पंचवीस वर्षाची खटोड प्रतिष्ठानची परंपरा आहे प्रतिष्ठानच्या वतीने नम्र निवेदन आहे की आपण आपल्या नातेवाईक मित्रसह किर्तन महोत्सव श्रवण करण्याकरिता १६ जून ते १८ जून रोज सकाळी दहा ते सायंकाळी दहा वाजेपर्यंत आपण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे उपस्थित रहावे प्रवेश किर्तन महोत्सव करिता सर्वांना विनामूल्य आहे. जास्तीत जास्त भाविकांनी कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा अशी विनंती स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान बीडच्या वतीने आपणास करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक नंदू सोपानराव गायकवाड यांनी निर्मिती प्रिंटर्स, कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३१५१५ येथे छापून सायं.दै.केज जननेता कार्यालय, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : नंदू सोपानराव गायकवाड, कार्यकारी संपादक : शेख महेबुब (सनी)

## खाजगी संस्थांच्या दावणीला बांधलेल्या जिल्हा प्रशासनामुळे

# नांदुरघाटची जि.प.शाळा वाचवण्यासाठी आत्मदहनाचा इशारा देण्याची वेळ यावी ही लाजिरवाणी बाब : गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी): एकीकडे येत्या शैक्षणिक वर्षापासून पहीलीपासुन विद्यार्थ्यांना सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे त्यामुळे गावच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे न जाता गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे यासाठी २५% पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट शासनाने दिले असून त्यासाठी आवश्यक सूचना दिलेल्या आहेत.जिल्हापरीषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी

शिक्षकांनी जुनच्या पहिल्या आठवड्यापासून कामाला लागण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र याचवेळी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेची शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमोल सखाराम जाधव यांनी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सहकार्य न करता खाजगी संस्था चालकांचे हित जोपासत अडथळे निर्माण करत असल्याने दि.१४ जुन रोजी शाळेच्या प्रांगणात आत्मदहनाचा इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे. अमोल जाधव यांच्या न्याय मागण्या मान्य करून त्यांना आत्मदहनापासुन परावृत्त करण्यात यावे हि शासन आणि प्रशासनासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे म्हणत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड, शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत



लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी नांदुरघाट ग्रामस्थांचा लढा गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असुन जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी, नळपट्टी आदी ग्रामपंचायतने करमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.तसेच शाळेत सीसीटीव्ही, शैक्षणिक साहित्य आणि पटसंख्या भरपूर असुन विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे उपक्रम राबविण्यात येत असुन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आहेत. शाळेमध्ये सर्वांगीण विकासासाठी नांदुरघाट ग्रामसथ मोलाचे योगदान देत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जनजागृती करावी,पालकांशी संपर्क करावा, सर्वेक्षण, अंगणवाडी,गृहभेटीतुन जनजागृतीचे उपक्रम राबवुन पटसंख्या किमान १५ ते २५ टक्के जास्त वाढविण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत.सर्वात जास्त पटनोंदणी केलेल्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे आणि दुसरीकडे नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील ग्रामस्थांची अडवणूक केली जात असुन असा दुजाभाव का?? त्यासाठी अमोल जाधव अध्यक्ष शालेय शिक्षण समिती यांच्यावर आत्मदहनाची वेळ यावी हा ढोंगीपणा नाही का?? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## दान केल्याने तुमच्या सर्व समस्या दूर होतात : पूज्ज भंते आचलानंदजी

बीड (प्रतिनिधी): दि.११/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता धम्मदीप बुद्ध विहार( बलभीम नगर) शिवाजीनगर पालवण रोड बीड विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुसरे गुरु संत कबीर यांच्या जयंतीचा व जेष्ठ पौर्णिमेचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रस प्रमुख धम्मदेसना देण्यासाठी पूर्णा येथील पूज्ज भंते आचलनांदजी व प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक आयु.विनोदजी मुळूक व आयु.कॅप्टन राजाभाऊ आठवले तसेच आयु डी. जी. वानखडेबाबा यांची उपस्थिती होती, या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध संत कबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कॅप्टन आठवले व वानखडे बाबा यांनी बौध्द उपासक उपसिक यांनी आपल्या मुलांवर बुद्ध धम्माचे संस्कार होण्यासाठी बौध्द बांधवानी सर्व प्रकारचे मतभेद दूर ठेऊन प्रत्येक महिण्याच्या पौर्णिमेस व दर रविवारी बुद्ध विहारात येऊन आपले सन उत्सवं एकत्र येऊन साजरा करणे ही कळाची गरज आहे असे मत मांडले तसेच धम्मामधील दान पारमितेचे महत्व सांगितले त्या नंतर पूज्ज भंते आचलानंदजी यांनी जेष्ठ पौर्णिमे बद्दल भगवान बुद्धाच्या जीवनातील प्रसंग सांगून धम्मदेसना दिली, शेवटी सरणतंय घेऊन ड तेजस वडमारे यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यक्रमास आयु. जयश्री विशाल वडमारे यांनी खीरदान केले या कार्यक्रमास अंजली तेजस वडमारे, कोमल वाघमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव, आशा धनवे, आचल वडमारे, मालन अंकुटे, जयश्री गवळी, रामाबाई सोनवणे, आम्रपाली गवळी, जानवी वाघमारे, प्रीती जाधव,आशा भालेराव, आयु.विशाल वडमारे, कुलदीप गवळी व शिवाजीनगर बलभीम नगर, मित्र नगर, दिलीप नगर परिसरातील बौध्द उपासक उपासिका, बालक बालिका मोठयासंख्येने उपस्थित होते.

## चौसाळा ते सात्रापोत्रा बससेवा तात्काळ सुरु करा अन्यथा बीड आगारामध्ये विद्यार्थ्यांना सोबत घेऊन शाळा भरवणार : आगलावे

चौसाळा (प्रतिनिधी): चौसाळा ते सात्रापोत्रा मार्गे बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी अन्यथा विद्यार्थ्यांना सोबत घेऊन बीड आगारामध्ये शाळा भरवण्याचा इशारा भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सहसचिव सचिन आगलावे यांनी बीड आगार प्रमुखांना दिला आहे. अनेक विद्यार्थी हे चौसाळा येथे शिक्षणासाठी येत असतात परंतु या ठिकाणी बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे या परिसरातील सात्रा पोत्रा,देवी बाबळगाव, अंधापुरी, सावरगाव, येथील बरेचसे विद्यार्थी हे चौसाळा येथे शिक्षणासाठी जात असतात या मार्गे कुठलीही बस सेवा नसल्यामुळे विद्यार्थी व पालकांना खूप मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याकारणाने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तरी बीड आगार प्रमुखांनी या प्रमुख मागणीकडे लक्ष देऊन चौसाळा ते सात्रा पोत्रा बससेवा चालु करावी अन्यथा दिनांक १५/०६/२०२५रोजी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन बीड आगारामध्ये शाळा भरविण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी बीड आगार प्रमुखाची राहील असा इशारा भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सहसचिव सचिन आगलावे यांनी दिला आहे.

## तुलसी समूहाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा नॅककडून तुलसी फॅशन कॉलेजला 'बी' श्रेणी प्राप्त





बीड (प्रतिनिधी): देवगिरी प्रतिष्ठाण संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन या महाविद्यालयाला नॅक समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या मूल्यांकनात 'बी' ग्रेड आणि २.२२ सीजीपीए प्राप्त झाला आहे. दिनांक २९ व ३० मे २०२५ रोजी नॅकच्या तीन सदस्यीय समितीने ऑनलाईन भेट देऊन महाविद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि गुणवत्ता निकषांचा सखोल आढावा घेतला. त्यानंतर ६ जून २०२५ पासून पुढील पाच वर्षांसाठी नॅकने 'बी' ग्रेडची मान्यता दिली आहे.

फॅशन डिझाईन क्षेत्रात महाराष्ट्रात आघाडीवर असलेल्या या महाविद्यालयाने आजपर्यंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि राज्यस्तरावर एकूण २७ पुरस्कार मिळवले आहेत. विविध फॅशन शो, स्पर्धा, कार्यशाळा आणि इतर उपक्रमांद्वारे विद्यार्थिनींना त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. शिक्षणातील चांगली गुणवत्ता आणि नवनवीन उपक्रमांमुळे महाविद्यालयाने नॅक मूल्यांकनातही आपली खास ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे संचालक प्रा.डॉ.प्रदीप रोडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले,नॅक कडून 'बी' ग्रेड मिळाल्याचा आम्हाला अत्यंत आनंद झाला असून हा क्षण तुलसी शैक्षणिक समूहासाठी अभिमानास्पद आहे. याआधी मॉडर्न कॉलेज (छत्रपती संभाजीनगर), डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज (नेकनूर), आणि तुलसी आयटी कॉलेज (बीड) या आमच्या महाविद्यालयांनी यश मिळवले असून आता फॅशन कॉलेजचाही त्यात समावेश झाल्यामुळे गुणवत्तेच्या वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हा प्रवास आम्ही सातत्याने आणि अधिक जोमाने पुढे नेत राहू. या यशस्वी वाटचालीत एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव यांच्यासारख्या मान्यवरांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन व भेटी संस्थेच्या प्रगतीस प्रेरणादायी ठरल्या. तसेच, प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले यांच्या कुशल नेतृत्वाखाली आयक्यूएसी समन्वयक प्रा. तूबा सैय्यद, क्रायटेरिया चेअरमन डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. सारादी ज्योत्स्ना गोगोई, डॉ. सुलेखा डोले, प्रा. शहाणा सय्यद आणि विभागप्रमुख डॉ. अस्मिता साळवे, डॉ. राहुल पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नामुळे नॅक मूल्यांकन प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या यशामुळे संस्थेच्या परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## डिजिटल मिडिया मराठी पत्रकार परिषदेची बैठक केज येथे संपन्न



**केज (सनी शेख):** मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न डिजिटल मिडिया मराठी पत्रकार परिषदेची महत्वपूर्ण आयोजित बैठक केज येथे शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.यावेळी डिजिटल मीडिया मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.पत्रकारांना येणाऱ्या विविध अडचणी दूर करण्यासाठी डिजिटल मिडिया मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली कसे विविध प्रयत्न शासन दरबारी चालू आहेत याची संपूर्ण माहिती डिजिटल मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे सरांनी यावेळी सांगितले. तसेच केज व धारूर तालुक्यातील डिजिटल मीडिया मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या व सदस्यांच्या निवडी जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. सदर बैठकीस डिजिटल मीडिया मराठी पत्रकार परिषदेचे केज तालुका अध्यक्ष रामदास तपसे, तालुका सचिव प्रकाश मुंडे,कार्याध्यक्ष इकबाल भाई शेख,उपाध्यक्ष अजय भांगे,संघटक सनी शेख,दशरथ चौरे,अशोक सोनवणे,रमेश गुळगुले,धनंजय कुलकर्णी,चंद्रकांत पाटील व धारूर तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



## पत्रकार सखाराम पोहिकर यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड (विवेक कुचेकर):** गेवराई तालुक्यातील मौजे गढी येथील एका गरीब कुटुंबातला व गढी ग्रामपंचायत मध्ये काम करून समाजकार्याची आवड आसल्यामुळे गेल्या वीस वर्षांपासून विविध दैनिकातुन सर्वसामान्य दिन दुबळ्याचे कोणतेही काम ते सहज शक्य होईल तितके लवकर काम ते करतात व आपल्या लेखनीतुन सर्व सामान्याला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आसतात त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन २०२४ मध्ये सरपंच सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब पावसे यांनी श्री सखाराम पोहिकर यांना समाज रत्न राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते यांची दखल घेऊन अमरावती येथील बी एस एफ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे हा पुरस्कार सोहळा अमरावती येथे येत्या ऑगस्ट महिन्यात होणार आहे तेव्हा या पुरस्कार सोहळ्याला चित्रपट क्षेत्रातील प्रसिध्द अभिनेत्री . दिग्दर्शक मॉडेन्स . यांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार सोहळा ऑगस्ट २०२५ रोजी अमरावती येथे समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने श्री सखाराम पोहिकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती बी एस एफ बहुउद्देशीय संख्येचे अध्यक्ष भूषण सरदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहिर केले आहे.

## पंचायत समिती अंतर्गत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा सर्व स्वच्छता विभागामध्ये होणारी लाभार्थ्यांची लूटमार थांबणार

बीड (प्रतिनिधी): बीड पंचायत समिती अंतर्गत असलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा व सर्व स्वच्छता विभागामध्ये दिवसा ढवळ्या लाभार्थ्यांकडून येथे असलेले तांत्रिक अधिकारी जेई पाचशे ते पाच हजार रुपये पर्यंत लुटमार सरसपणे राज रोज करत आहेत अशा प्रकारची बातमी देखील मागच्या काही दिवसापूर्वी वर्तमानपत्रांमध्ये छापून आली परंतु या ठिकाणी असलेले जेई सांगतात की कितीही बातम्या छापून आल्या तरी आम्हाला अशा बातम्यांचा कहीच फरक पडणार नाही किती पेपर मध्ये आमच्याविरुद्ध बातम्या आल्या तरी आम्हाला त्याचे काहीच वाटत नाही आणि काही घेणे देणे नाही अशा प्रकारची देखील या ठिकाणी कार्यरत असलेले जेई तांत्रिक अधिकारी सरसपणे बोलत असल्याचे येथे येणाऱ्या लाभार्थ्यांमधून बोलले जात आहे म्हणून आता बीड जिल्हा परिषदेला नवीन आलेले मुख्य कार्यकारी मुख्याधिकारी सीईओ साहेब याच्यावर कशाप्रकारे क्शन घेतात हे देखील पाहणे गरजेचे आहे कारण की कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे साहेब यांना याच्या अगोदर आलेल्या वर्तमानपत्रांमध्ये छापून वृत्ताची माहिती आहे तरी देखील त्यांनी या विभागाकडे एकदाही येऊन पाहिले नाही व कानाडोळा ते देखील नेमके कशामुळे करत आहेत म्हणून आता येथे येणाऱ्या लाभार्थ्यांमधून बोलले जात आहे की या ठिकाणी होणारी पाचशे ते पाच हजार रुपये पर्यंत ची आर्थिक गोरगरीब लाभार्थ्यांकडून लुटमार थांबणार का अशीच आता दिवसा न दिवस पुढे चालणार हे देखील आंधळे साहेबांनी एकदा येऊन या ठिकाणी या येथे असलेले सर्व जेई तांत्रिक अधिकारी यांना समोर बोलून चांगल्या प्रकारे इतिहास भूगोलाचे धडे शिकवणे देखील गरजेचे असल्याचे बोलले जात आहे आणि वर्तमान पत्रामध्ये छापून येणाऱ्या बातम्यांच्या बाबतीत कसा यांना फरक पडत नाही हे देखील एकदा आंधळे साहेब आपण यांना विचारा असे देखील लाभार्थ्यांमधून आणि नागरिकांमधून बोलले जात आहे आता या महत्त्वाच्या विषयावर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग बीड मुकुंद आंधळे कशाप्रकारे क्शन घेतात का येथे असणारे तांत्रिक अधिकारी जेई यांना असेच आर्थिक लूटमार करण्यासाठी मोकळे सोडतात देखील पाहणे गरजेचे आहे तसेच नवीन आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी देखील पदभार स्वीकारल्यानंतर ताबडतोब पंचायत समिती या ठिकाणी येऊन ग्रामीण पाणी पुरवठा विभागामध्ये एकदा सदिच्छा अचानक भेट देऊन त्या ठिकाणचा अहवाल या ठिकाणी असणारे उपअभियंता यांच्याकडून मागवून घेऊन त्यांचे व त्यांच्या सर्व येथे असलेल्या तांत्रिक अधिकारी यांचे कशाप्रकारे कार्य चालू आहे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे हे देखील तपासून पाहणे गरजेचे असल्याचेही नागरिकांमधून बोलले जात आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा विचार आत्मसात करणे हेच फाऊंडेशनचे उद्दिष्ट : दिपक होळकर

केज (प्रतिनिधी): रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा संकल्प डोळ्यासमोर ठेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्माउत्सवानिमित्त व शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य ठेवून बोरगांव बु.येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर तसेच कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले. फाऊंडेशन व अहील्या प्रबोधनी मंच तर्फे करण्यात आले .सदरील शिबिरास उपजिल्हा रुग्णालय केज पंचायत समिती केज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.मोराळे , डॉ.शेटे ,डॉ.सावंत,डॉ.कुलकर्णी ,डॉ.राऊत औषध निर्माण अधिकारी श्री चाटे यांनी आरोग्य तपासणी केली.कायदेविषयक जनजागृती करताना ड. डी. टी.सपाटे व ड. मिसळे एस. व्ही. यांनी परखड शब्दांत ग्रामस्थांना मार्गदर्शन व नवी दिशा दिली. शिबिरात ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे तपासणी करून औषध उपचार करून घेतले. आरोग्य शिबिरास रामहरी राऊत (कार्याध्यक्ष शिवसेना मदत कक्ष महा.राज्य.) ड.योगेश दिलीप चांगण अध्यक्ष आरंभ फाऊंडेशन व श्री शशिकांत बापू गव्हाणे भारतीय किसान संघ यांचे अमूल्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले शिबिर यशस्वीतेसाठी आरंभ फाऊंडेशन चे सचिव व अहिल्या प्रबोधनी मंच चे अध्यक्ष श्री.दिपक रमेश होळकर मंचचे सचिव ड. उत्तरेश्वर बा.निंगुळे, विजय निंगुळे फौजी, अशोक निंगुळे, गोपाळ निंगुळे,जगन्नाथ होळकर, निलेश निंगुळे,भगवान मामा गाते,लोंढे मामा,बाबासाहेब निंगुळे व्यवस्थापक निखिल मुसळे, पवन बोराडे,गणेश गुरव, दिगंबर निंगुळे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे बोरगांव बु.चे पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. या आरोग्य शिबिराचे सूत्रसंचलन कु.सायली दिगंबर होळकर व ड श्री उत्तरेश्वर बा.नींगुळे यांनी. सामाजिक उपक्रमाने कार्यक्रम घेण्यात आल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## घरकुलासाठीचे पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुका स्तरावर तात्काळ सुरु करा : कांबळे

माजलगाव (प्रतिनिधी): घरकुलासाठी असलेल्या मोफत पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुकास्तरावर सुरू करून त्यात होत असलेला अनागोंदी कारभार थांबवा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी तहसील प्रशासनाला निवेदनाद्वारे आज दि. १० जून २०२५ रोजी दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्या बांधकाम कामास विलंब होत आहे. घरकुल योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यासाठी पाच ब्रास वाळूचा पुरवठा आवश्यक असून सद्यस्थितीत तालुका स्तरावर त्याबाबतचे टेंडर प्रक्रियेस प्रारंभ झालेला नाही. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. तरी माजलगाव तालुक्यात तात्काळ वाळू (पाच ब्रास) टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात यावी अन्यथा दि.१२/०६/२०२५ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसील प्रशासनाला उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी दिला आहे. यावेळी मोतीराम कांबळे, मोहन कांबळे, बाबासाहेब कांबळे, सुखदेव आडागळे, संजय कांबळे, बंडू आडागळे, अशोक कांबळे, भैया कांबळे, संकेत कांबळे, शाम कांबळे, किरण कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, विक्रांत कांबळे, पांडू कांबळे, कल्याण कांबळे, धुराजी आडागळे, प्रदीप कांबळे, शरद कांबळे, सुंदर कांबळे, शरद कांबळे, विकास कांबळे यांची उपस्थिती होती.






सायं.दैनिक

# जननेता

• संपादक : नंदू गायकवाड •









## फसव्या घोषणा करुन सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या

# महायुतीच्या सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा : गोरख सिंघन

बीड (प्रतिनिधी): पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत साहेब,संपर्क नेते सुनिल प्रभु साहेब,विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब व जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड जिल्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बीडचे तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, वडवणीचे तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ व माजलगावचे विधानसभा प्रमुख नामदेव सोजे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासनाने केलेल्या फसव्या घोषणांच्या विरोधात बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात भव्य चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे साठे चौक परिसरात वाहनांच्या भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या, शिवसैनिकांचा जुना व साहेबांच्या काळातील जल्लोष बघायला मिळत होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, या घोषणाबाज सरकारच करायचय काय खाली मुंडके वर पाय, शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचा विजय असो, महाराष्ट्र शासन हाय हाय..अशा नावाचे फलक शिवसैनिकांच्या हातात सर्वत्र दिसत होते, तसेच मोठमोठ्या भगव्या झेंड्यानी वातावरण फुलून गेले होते. जुन्या काळातील शिवसेना पुन्हा आज बघायला मिळाली यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन म्हणाले की , महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु ,




लाडक्या बहिणीला २१०० रु.देऊ, ४५ हजार गावात पांदन रस्ते करु , शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील जी.एस .टी. अनुदानाच्या स्वरुपात कमी करु ,१ रुपायात पिकविमा काढू , वयस्कर पेनशन धारकांना २१०० रु देऊ . अन्नदाता बनेल ऊर्जा दाता , शेतीला २४ तास वीज, शेतीमालाला हमीभाव देवू ,हर घर जल ,हर घर छत ,अशा फसव्या व शक्य नसलेल्या योजनेची लालच दाखवून मते घेतली व सरकार स्थापन केले पण सत्ता हातात आल्यावर या सर्व योजना गुंडाळून आता लाडक्या बहिणींची तपासणी चालू केली आहे हा हि निव्वळ फसवणूक आहे असे सिंचन अण्णा यांनी सांगितले , तसेच जाहीर केलेल्या घोषणांची अंमलबजावणी न केल्यास यापुढे उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तीव्र आंदोलन करण्याचा येईल असा इशारा शासनाला दिला. या चक्का जाम आंदोलनाला उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन बीड, तालुकाप्रमुख विनायक बप्पा, धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ, जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके, युवराज मामा शिंदे, वडवणी मुळे, माजलगावचे विधानसभाप्रमुख नामदेव सोजे पाटील, धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ, युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, वडवणीचे युवासेनेचे तालुका युवाअधिकारी नवनाथ मोरे ,बीड तालुका सचिव नंदु येवले, सहसचिव संदिप भानप ,माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख अशोक गोंडे, युवा नेते मुकेश घुमरे,सर्कल प्रमुख अशोक खांडे , सर्कल प्रमुख नारायण तौर , सरपंच बाळासाहेब कुटे, सरपंच संजय धपाटे, युवा नेते ज्ञानेश्वर सिंघन , माजी सरपंच सखाराम मोहिते, चेअरमन मुन्ना पवार ,पाली सर्कल मधील कोल्हारवाडीचे शाखाप्रमुख राजेंद्र भोसले,इमामपुरचे शाखाप्रमुख सुनिल कदम,वायबटवाडीचे शाखाप्रमुख गणेश वायबट ,धनगर वाडीचे शाखाप्रमुख परमेश्वर भावले , मोची पिंपळगावचे शाखाप्रमुख नितेश आखाडे, करझणीचे शाखाप्रमुख अन्साराम जगताप, समनापुरचे शाखाप्रमुख नारायण गोरे , दत्ता चोरमले, प्रल्हाद रांजवण, अशोक जाधव ,पदवी भोसले ,उमेश घललाळ, नितीन घललाळ, हनुमान घललाळ, युवानेते भरत खरात ,करणं लांडगे, विशाल पटेकर, चंदू बजगुडे , सचिन बजगुडे,रामप्रूबजगुडे, आदेश कुटे, मनिष कुंटे ,दत्ता शिंदे, बाळु तट , अशोक कांबळे, अशोक वैध,बाबु कुटे, श्रीधर जाधव, गोपाळ धर्मे , सुनिल जरकळ, बाळासाहेब बेंगडे , सुनील भामरे ,बंडू सावंत, बाबा तिबोलै, महेशं बारस्कर यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणुन ओळख असलेल्या श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस मा. मंत्री जयदत्त क्षीरसागर साहेब यांनी भेट दिली असता त्यांचा शाल श्रीफळ देवुन सत्कार करताना ह, भ, प, महादेव महाराज चाकरवाडीकर सह आदी.**

# मानसिक आरोग्यासाठी ईश्वर भक्तीची गरज : प्रदीप मिश्रा

श्री क्षेत्र चाकरवाडी (प्रतिनिधी): सध्याच्या परिस्थितीत माणूस हा पूर्णपणे खचलेला आहे. गोंधळलेला आहे मुलं ऐकत नाहीत, पत्नी ऐकत नाही, आई-वडिलांच मुले ऐकत नाहीत, सर्वत्र गोंधळाची परिस्थिती असून माणूस हा मानसिक दृष्ट्या गोंधळलेला आहे अशा परिस्थिती मानसिक आरोग्यासाठी ईश्वर भक्तीची गरज असल्याचे प्रतिपादन परमपूज्य दीपक जी मिश्रा यांनी केले. चाकरवाडी येथील विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराणकथेत दीपक जी मिश्रा बोलत होते. ईश्वर भक्ती हीच माणसाला स्थैर्य लाभून देते. त्यामुळे ईश्वरभक्तीतच मोठा आनंद असल्याचे दीपक जी मिश्रा यांनी सांगून पुढे ते म्हणाले की



ईश्वर सेवा ही तर महत्त्वाची आहेच त्याशिवाय दिन दलित दुःखी त्यांची सेवा करणे यात सुद्धा ईश्वर भक्तीचा सार आहे. गरिबांच्या सेवेतूनही देव मिळतो शरीराला आजार झाला तर तो नष्ट करण्यासाठी औषधी घेतल्या जातात मात्र मनाला झालेला रोग हा केवळ ईश्वर भक्तीतून दूर होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने ईश्वरभक्ती करणे गरजेचे आहे ईश्वर भक्ती केल्यानेच मानसिक आजार दूर होऊ शकतात एवढी ताकद ईश्वर भक्ती मध्ये आहे. माणूस कोण आहे आणि कोठे बसलेला आहे यावर त्याचे महत्त्व विशद होते. दारूचा, अड्डा जुगाराचा अड्डा आणि संत संगत या तीन पैकी संत संगतीत माणसाचे महत्त्व नक्कीच अधिक असते. शिवशंकर हे भोळे असून अपार श्रद्धा आणि भक्ती करणाऱ्या भक्ताला ते पावन होतात पैशाने श्रीमंत असून चालत नाही शरीराला झालेला रोग पैशाने आणि औषधाने कमी करता येईल, परंतु मनाला झालेला रोग हा केवळ अध्यात्मात आणि ईश्वर भक्तीतून दूर होऊ शकतो, असे मार्गदर्शन यावेळी दीपक जी मिश्रा यांनी केले.

# वामा चित्रपटाचे यशस्वीरित्या चौथ्या आठवड्यात पदार्पण



बीड (प्रतिनिधी): सुपरस्टार डॉ.महेश कुमार च्या वामा लढाई सन्मानाची चित्रपटाचे यशस्वीरित्या चौथ्या आठवड्यात पदार्पण झाले असून दुसऱ्या चित्रपटाचे देखील मध्य प्रदेशचे आमदार गोपाल सिंग यांच्या हस्ते डॉ. महेश कुमार यांच्या नवीन चित्रपट गौरी शंभू ची भोपाळ इथून यशस्वी सुरुवात झाली. यावेळी आमदार गोपाल सिंग यांनी भोपाळ येथे दि. ११ जून रोजी डॉ.महेश कुमार यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हिंदी चित्रपटांच्या तोडीस तोड मराठी चित्रपट वामा ला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. मागच्या एका महिन्यापासून बीडमध्ये सर्वत्र वामा चित्रपटाची चर्चा होताना दिसत आहे, बीडच्या मातीतून उगवलेला एक सितारा बॉलीवूड गाजवत आहे , ही बीडकरांसाठी देखील अभिमानास्पद गोष्ट आहे. वामा चित्रपटाला बीड जिल्ह्यातील प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल पहिल्या येणाऱ्या १० महिलांसाठी वामा चित्रपट मोफत असणार आहे. तसेच महाराष्ट्रभर सुरू असलेले ३०० रुपये तिकीट बीडकरांसाठी सरसकट सर्वांसाठी फक्त ११० रुपये करण्यात आलेले आहेत. शुक्रवार ते रविवार सकाळी ९ आणि सोमवार ते गुरुवार सायंकाळी ६:३० वाजता शो चा टाईम आहे. तनिष्का सिनेमा टॉकीज छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ बीड येथे सर्वांनी वामा चित्रपट पहावा आणि मनोरंजन सह एक नवीन दृष्टिकोन अनुभवावा असे आवाहन दिग्दर्शक अशोक आर कोंडके आणि निर्माता सुब्रमण्यम कडियाला यांच्याकडून करण्यात आले आहे.

# इस्त्रोच्या अभ्यास दौरासाठी सार्थक शिनगारेची निवड



किल्लेधारूर (प्रतिनिधी): धारूर येथील हुतात्मा पापा सिंह विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक विनायक शिनगारे यांने मागील काही दिवसांखाली घेण्यात आलेल्या परीक्षामध्ये सी.व्ही. रमन बाल वैज्ञानिक परीक्षेत पात्र झाल्यामुळे त्याची इंडियन स्पेस रिसर्च सेंटर (इस्रो) च्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल सार्थक याचे शाळेचे मुख्याध्यापक बालासाहेब सोळंकें यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी परिवहन मंत्री सरनाईक यांना मराठी पत्रकार परिषदेचे निवेदन



बीड (प्रतिनिधी): महाराष्ट्रातील सर्व आधी सुकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी- स्लीपर बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाड्यांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही. आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन महाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.

# जनावरांची ५० मुंडके सापडल्याने बीडमध्ये खळबळ; मनसेकडून पोलीसांकडे तक्रार!

## जनावराची कत्तल करणाऱ्यांवर कारवाई करावी : सोमेश्वर कदम

बीड (प्रतिनिधी)-बीड शहराजवळील पिंपरगव्हाण रोड,करपरा नदीपात्रा नजिक जनावरांची जवळपास ५० च्या वर मुंडकी व जनावरांची कातडी सापडल्याने खळबळ उडाली असून बीड मध्ये गोहत्या होत असल्याचा पुरावाच मिळाला आहे. बीड शहरातील शाहूनगर भागातील करपरा नदी जवळ झाडाझुडपामध्ये जनावरांची जवळपास ५० च्या वर मुंडके व काही जनावरांची कातडी असल्याची माहिती मनसेचे जिल्हा सचिव प्रमुख सोमेश्वर कदम यांना मिळाली असता तत्काळ करपा नदीपात्राजवळ जाऊन याची खात्री करून याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना देण्यात जनावरांची मुंडकी सापडल्याने जनावरांची कत्तल करून मुंडके सिमेंटच्या गोण्यामध्ये भरून करपरा नदी जवळ टाकण्यात आल्याने गोरक्षका मध्ये संताप व्यक्त होत असून, जनावरांची कत्तल करून धड(मुंडके) उघड्यावर फेकणारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मनसेचे सोमेश्वर कदम यांनी केली आहे. चार दिवसापूर्वी बकरी ईद सण असल्याने बकर्यासह इतर जनावरारे कत्तलसाठी बीड शहरात येणार असल्याने बीड पोलीस प्रशासन सतर्क असल्याने मागील आठवड्यात डीवायएसपी पूजा पवार यांनी बार्शी नाका भागात एका वाहनांमध्ये कत्तलसाठी जनावरे येणारा असल्याची माहिती मिळताच ते वाहन जप्त करण्यात आले.तसेच बकरीईद च्या पूर्वसंध्येला मोहम्मदिया कॉलनी एका शेडमध्ये कत्तलसाठी गाई ठेवल्या असल्याची माहिती बीड एसपी पथक व पेठ बीड पोलिसांना मिळाले असता तत्काळ सदरील ठिकाणी जाऊन पोलिसांनी छापा मारून १७ गायींची सुटका केली होती. राज्य सरकारने गोहत्या बंदी कायदा केला असला तरी बीड शहरात मात्र राजरोस जनावराची कत्तल केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे गोहत्या बंदी फक्त नावाचा आहे का?असा सवाल गोरक्षकांनी केला आहे.

# पाण्याच्या टाकीचे काम सुरू करा : शिनगारे



**किल्लेधारूर (विश्वास शिनगारे):** धारूर शहरासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम युद्धपातळीवर चालू आहे या कामांमध्ये बाज-ारपेठेसाठी हुतात्मा स्मारक येथे पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे, हे काम त्याजागी करू नये म्हणून धारूर शहरातील काही नागरिकांनी निवेदन दिले होते. पण हुतात्मा स्मारक येथेच बाजारपेठेसाठी योग्य जागा असल्याने या जा-गेवरच पाण्याची टाकी उभा करावी. यासाठी शिवसेनेचे अजित शिनगारे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे. धारूर शहराच्या दृष्टीने नव्याने पाईपलाईनचे काम चालू आहे, यासाठी शहरात दोन ठिकाणी पाणी साठवण करणे आवश्यक असल्या कारणाने एका टाकीचे कसबा भागातील तलवा जवळील ठिकाणी पाणी साठवण टाकीचे काम चालू आहे. तर पेठ विभागासाठी हुतात्मा स्मारक या ठिकाणी चालु आहे, हुतात्मा स्मारक हे ठिकाण शहराच्या उंच ठिकाणावर असल्यामुळे पेठ विभागाला पाणीपुरवठा करताना पाणी दाबाची कसलीही अडचण येणार नाही व पूर्ण क्षमतेने पाणी नागरिकांना मिळणार असल्याने ती जागा योग्य आहे. मात्र काही नागरीकानी हुतात्मा स्मारक मधील टाकीचे काम बंद करण्यासाठी नगरपालिकेला निवेदन दिले आहे. व काम थांबवले आहे, मात्र बीड,परभणी व अन्य ठिकाणी स्मारकात पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत, याची दखल घेऊन आपल्या धारूर शहरात पाण्याचे टाकीचे हुतात्मा स्मारक येथे काम सुरू आहे. ते काम मागील काही दिवसांपासून बंद आहे ते काम तत्काळ चालू करावे यासाठी ९ जून सोमवार रोजी शिवसेनेचे अजित शिनगारे यांनी धारूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास १३ जून रोजी आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला.

# माहिती संचालकांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत सूचनांचे निवेदन

बीड (प्रतिनिधी): मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्यामार्फत माहिती व जनसंपर्क विभाग मंत्रालय मुंबईचे संचालक डॉ. गणेश मुळे यांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत निवेदन देण्यात आले या निवेदनात पत्रकारांच्या योजनांसाठी असलेल्या जाचक अटी काढून टाकाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषद गेल्या अनेक दिवसापासून पत्रकारांसाठीच्या विविध योजनांच्या आटी आणि नियमात बदल करावेत अशी मागणी सातत्याने करत आहे. या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन यात काही सुधारणा करण्याची तयारी दाखवली आहे. यात काय बदल अपेक्षित आहेत. अशा सूचना करणारे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्फत संचालक डॉ. गणेश मुळे यांना देण्यात आले या निवेदनामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी वयाची अट ५८ वर्ष व अनुभवाची अट २५ वर्षे करावी. सलग तीस वर्षे सेवा ही अट रद्द केली जावी. ज्यांच्याकडे विना खंड सलग तीस वर्षे अधिस्वीकृती पत्रिका आहे आणि ज्यांचे वय ५८ वर्ष आहे अशा पत्रकाराला सन्मान योजनेचा लाभ दिला जावा. महाराष्ट्रात असंख्य पत्रकार असे आहेत की त्यांच्याकडे तीस वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकार योजना पासून ते वंचित राहतात. अशा स्थितीत जिल्हा माहिती अधिकारी आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे शिफारस पत्र ग्राह्य समजले जावे. शिवाय संबंधित पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जावे. अनेक साप्ताहिकाच्या प्रेस लाईन वर मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक म्हणून एकाच व्यक्तीचे नाव असते मुद्रक अथवा प्रकाशक म्हणून नाव आहे म्हणजे तो



पत्रकार अन्य व्यवसाय करतो असे नाही. ते फक्त सोयीसाठी असते. त्यामुळे प्रकाशक आणि मुद्रक म्हणून नाव असणाऱ्यांचा तो अन्य व्यवसाय आहे असे समजू नये त्यालाही लाभ मिळावा. उत्पन्नाची अट दोन लाखावरून वाढवून ती पाच लाख करावी. सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या एखाद्या पत्रकाराचे निधन झाले तर त्याच्या पत्नीला ती हयात असेपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा. पत्रकार महिला असेल तर तिच्या पश्चात तिच्या पतीला हा लाभ मिळावा. अशा सूचना करण्यात आल्या. याशिवाय शंकराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीबाबत काही सुधारणासाठी सूचना करण्यात आल्या आहेत. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजातून ही योजना चालविण्यापेक्षा या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावी. त्यामुळे पत्रकारांसाठीच्या योजनांना निधीची कमतरता भासणार नाही .शंकराव चव्हाण निधीचे जे विश्वस्त मंडळ आहे त्यांच्या बैठका नियमित होत नाहीत दर दोन महिन्यांनी या ट्रस्टच्या बैठका झाल्या तर पत्रकारांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. आरोग्य योजनेचा लाभ देताना ठराविक आजाराची मर्यादा रद्द करून ही योजना सर्व प्रकारच्या आजारासाठी लागू करावी. अनेकदा असे आढळून आले आहे की बऱ्याच पत्रकारांचे मेडिक्लेम असतात अशा पत्रकारांना त्याची सर्व ओरिजनल कागदपत्रे विमा कंपन्यांना द्यावी लागतात. परिणामतः अशा पत्रकारांना योजनेचा लाभ मिळत नाही .अशा पत्रकारांची हॉस्पिटलची झेरॉक्स कागदपत्रे ग्राह्य धरली जावीत आणि महत्त्वाचे म्हणजे या योजनेसाठी असलेली आधिस्वीकृती पत्रिकेची आठ रद्द केली पाहिजे. राज्यात केवळ आठ टक्के पत्रकारांकडेच आधिस्वीकृती असल्याने ९२ टक्के पत्रकार या अटीमुळे योजनेच्या लाभांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या मृत्यूनंतर किमान पाच लाख रुपयांची मदत संबंधित पत्रकाराच्या पत्नीला किंवा मुलांना मिळाली पाहिजे. ही रक्कम मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत तातडीने दिली जावी त्यासाठी देखील आधिस्वीकृती पत्रिकेची अट नसली पाहिजे आमची सरकारला विनंती आहे की या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी ही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय संघटक सुभाष चौरे ,विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर , जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदिंच्या सह्या आहेत.

## बँकेचे चेक हरवले आहे

**फुलचंद सुरेश वारभवन रा.बाळापूर ता.जि.बीड यांचे नेकनूर ते मांजरसुबा बस प्रवासात क्सिस बँक शाखा बीड चे चेक हरवले आहे. खाते क्र.९२२०१००३२९६७२४१/चेक क्र.२५०९७६ ते २५०९८० कोणाला सापडल्यास संपर्क करा.**

**संपर्क क्र.9322103447**